भारत सरकार

# सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय

# अपंग व्यक्ती (दिव्यांगजन) यांचे सक्षमीकरण विभाग

**५ वा मजला, पं. दीनदयाल अन्त्योदय भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली ११०००३**

# अपंग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती

शिक्षणाद्वारे अपंगांच्या सक्षमीकरणासाठी १ एप्रिल २०१८ पासून अपंगांच्या सक्षमीकरण विभागाच्या वतीने अम्ब्रेला स्कीम ''अपंग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची'' अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेचे सहा घटक आहेत म्हणजेच दहावीपूर्व, दहावीनंतर, उच्च शिक्षण, नॅशनल ओव्हरसीज, राष्ट्रीय शिष्यवृत्ती आणि मोफत प्रशिक्षण. अंब्रेला स्कीमची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे :

| अ. क्र. | घटक | प्रशिक्षण अभ्यासक्रम | दरवर्षी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीची संख्या | पालकांची वार्षिक कमाल उत्पन्न मर्यादा (रु.) | शिष्यवृत्तीचा दर | अर्ज कसा करावा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अपंग विद्यार्थ्यांसाठी दहावीपूर्व शिष्यवृत्ती | वर्ग नववी आणि दहावी | २०००० | २.५० लाख | डे स्कॉलरसाठी दरमहा रु. ५०० आणि वसतिगृहात राहणाऱ्यासाठी दरमहा रु. ८०० अधिक दरवर्षी रु. १,०००/- चे पुस्तक अनुदान आणि रु. २,०००/- ते ४,०००/- श्रेणीपर्यंत अपंग भत्ता. | राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलद्वारे या तीन शिष्यवृत्तींची अंमलबजावणी होणार आहे. राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करा **(www. scholarships.gov.in)**<br><br>नोंदणीसाठी पोर्टल दि. २३ जुलै २०१८ पासून उघडणार आहे.<br><br>ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक हा :<br><br>१. दहावीपूर्व : ३० सप्टेंबर २०१८<br><br>२. दहावीनंतर : ३१ ऑक्टोबर २०१८<br><br>३. उच्च शिक्षणासाठी : ३१ ऑक्टोबर २०१८ |
| २ | अपंग विद्यार्थ्यांसाठी दहावीनंतरची शिष्यवृत्ती | वर्ग अकरावी ते उच्च पदविका / डिप्लोमा | १७००० | २.५० लाख | विविध शाखांतील उच्च पदविका, पदवी, डिप्लोमा, व्यावसायिक अभ्यासक्रम, पदवीपर्यंतचे ते डिप्लोमाचे अभ्यासक्रम, इ.साठी देखभाल भत्त्यासाठी वेगवेगळे दर आहेत. वसतिगृहात राहणाऱ्यांसाठी दरमहा रु. ९००-१६०० श्रेणीपर्यंत आणि डे स्कॉलर्ससाठी दरमहा रु. ५५०- ७५० श्रेणीपर्यंत अधिक शिकवणी शुल्क (जास्तीत जास्त मर्यादा रु. १.५० लाख दरवर्षी) पुस्तके भत्ता रु. १५००/- दरवर्षी आणि अपंगत्व भत्ता श्रेणी रु. २०००/- ते रु.४०००/- पर्यंत दरवर्षी | |
| ३ | उच्च शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती | पदवी / उच्च पदविका किंवा २४० उत्कृष्ट अधिसूचित संस्थेमधून डिप्लोमा | ३०० | ६.०० लाख | वसतिगृहात राहण्यासाठी रु. ३०००/- मासिक देखभाल भत्ता. रु. १५०० डे स्कॉलर्ससाठी दरमहा. रु. २०००/- अपंगत्व भत्ता, रु. ५०००/- दरवर्षी पुस्तक अनुदान आणि शिकवणी शुल्क रु. २ लाख दरवर्षी. | |
| ४ | अपंग विद्यार्थ्यांसाठी नॅशनल ओव्हरसीज शिष्यवृत्ती | परदेश विद्यापीठातील मास्टर डिग्री आणि डॉक्टरेट | २० | ६.०० लाख | ९९०० पाउंडमध्ये (ग्रेट ब्रिटन) देखभाल भत्ता दरवर्षी UK आणि US साठी $ १५.४०० हे इतर देशांसाठी अधिक शिकवणी शुल्क, वार्षिक आकस्मिक भत्ता, विमान प्रवासाची रक्कम इ. | या विभागाच्या संकेतस्थळावर म्हणजेच www. disabilityaffairs.gov.in अर्ज सादर करण्याचा नमुना सादर करण्यात आलेला आहे. आवेदन अर्ज विहित नमुन्यात अंडर सेक्रेटरी (स्कॉलरशिप) अपंग व्यक्तींचे सक्षमीकरण विभाग, खोली क्र. ५१६, ५ वा मजला, पं. दीनदयाल अन्त्योदय भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली ११०००३ संपूर्ण वर्षासह. |
| ५ | अपंग व्यक्तींसाठी राष्ट्रीय फेलोशिप | भारतीय विद्यापीठांमध्ये एम.फिल / पीएच. डी | २०० | उत्पन्नाची कमाल मर्यादा नाही | मासिक रु. २५,०००/- JRF साठी (प्रथम दोन वर्षे) आणि SRF साठी रु. २८,०००/-(तृतीय वर्षांनंतर अभ्यासक्रम पूर्ण कालावधी पर्यंत) आणि आकस्मिक अनुदान, एस्कॉर्ट भत्ता/ रीडर भत्ता आणि घरभाडे भत्ता (लागू दरानुसार) | विद्यापीठ अनुदान आयोगाकडून निवड करण्यात येईल. यूजीसीकडून जेव्हा अर्ज मागविण्यात येतील, तेव्हा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करावेत. अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरण विभागाकडे अर्ज पाठविण्याची आवश्यकता नाही. |
| ६ | मोफत मार्गदर्शन | शासकीय/ सार्वजनिक क्षेत्रात नोकरीसाठी स्पर्धात्मक परीक्षा देत असलेल्या उमेदवारासाठी आणि तांत्रिक आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्यांसाठी | २००० | ६.०० लाख | या विभागाच्या सूचित नाव असलेल्या संस्थांना मार्गदर्शन शुल्क देण्यात येईल. बाहेरगावातील विद्यार्थ्यांसाठी स्टायपेंड आणि विशेष अपंग भत्ता @ रु. ७,०००/- दरमहा आणि स्थानिक विद्यार्थ्यांसाठी रु. ४,५००/- दरमहा देण्यात येईल. | सूचित नाव असलेल्या मार्गदर्शक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा. या विभागाच्या संकेतस्थळावर सूचीतील संस्थांची यादी उपलब्ध आहे. |

सक्षम वैद्यकीय प्राधिकरणाकडील अधिकृत अपंगांचे प्रमाणपत्र आणि ४०% पेक्षा जास्त अपंगत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच वरील सर्व शिष्यवृत्त्या लागू होतील. अपंग अधिकार कायदा २०१६ मध्ये उल्लेखित असलेल्या अपंगत्वाच्या व्याख्येनुसार.

या शिष्यवृत्ती योजनेच्या संपूर्ण माहितीसाठी कृपया **www.disabilityaffairs.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्या.

**davp 38117/11/0049/1819**